# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

सर्व्हे नं ८३२ ए, फायनल प्लॉट नं.१७८ व १७९, भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे ४११ ००४.

फो.नं.०२०-२५७०५००० ई-मेल secretary.stateboard@msbshsc.ac.in फॅक्स नं.०२०-२५६६५८०७


## परिपत्रक

**परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना /५२६८ पुणे, दिनांक :१८ ऑक्टोबर, २०१७**

विषय - माध्यमिक स्तरावरील इ.९वीच्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या (दिव्यांग) विषययोजना व मूल्यमापन योजनेच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१५/(११९-अ)/एस.डी.६, दि.०८ जानेवारी,२०१६

२. शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१५/११९-अ/एस.डी.६, दि.१५ फेब्रुवारी,२०१६

३. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र.क्र.१९५/१६/एस.डी.६, दिनांक ११ जानेवारी, २०१६

४. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम, विषययोजना व तासिका नियोजन/२२२७, दिनांक २७/४/२०१७.

५. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम/ मूल्यपान योजना/ ३६२५, दिनांक १२/७/२०१७.

६. या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक : क्र.रा.मं./पापुअ/पापुई/संशोधन/इ.९वी पुनर्रचित अभ्यासक्रम / विषययोजना, तासिका नियोजन व मूल्यमापन योजना/ ३९६०, दिनांक २८/७/२०१७.

७.या कार्यालयाचे परिपत्रक क्र.रा.मं./संशोधन/विशेष गरजा असलेल्या (दिव्यांग) विद्यार्थ्यांसाठीच्या विषय योजनेबाबत/ मूल्यमापन योजना/४३४३ पुणे४,दि.१८/०८/२०१७.

८.शासन पत्र क्र.संकीर्ण-२०१६/(२४९/१६)/एसडी-४, दि.६ ऑक्टोबर, २०१७.

या परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र राज्यातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना / मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, इ.९वीसाठी विशेष गरजा असलेल्या दृष्टीबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, बहुविकलांग (स्पॅस्टिक), ऑटिस्टिक (स्वमग्न), सेरेबल पाल्सी, मतिमंद, गतिमंद इत्यादी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मंडळाने विषय योजना, अभ्यासक्रम तयार केला आहे. तसेच उपरोक्त संदर्भीय परिपत्रके आपणांस यापूर्वीच पाठविण्यात आलेली आहेत. विशेष गरजा असलेल्या "दिव्यांग" विद्यार्थ्यांसाठी अनेक सोयी सवलती मंडळाने यापूर्वीच वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली आहेत हे आपणांस विदित आहेच.

कर्णबधिर, अंध, अपंग, दृष्टीदोष असलेल्या व अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर (७६) (इ.७वीचे अंकगणित)". "कार्यानुभव" विषय घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. "अंध" विद्यार्थ्यांना फक्त "गणिताबरोबर" "कार्यशिक्षणाच्या विषयातील कोणताही एक विषय" घेता येईल. "कर्णबधिर" विद्यार्थ्यांना "दोन भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "बहुविकलांग" विद्यार्थ्यांना "दोन

भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" प्रत्येक विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "अध्ययन अक्षमता" असलेल्या विद्यार्थ्यांना "एका भाषांऐवजी" व "गणिताबरोबर" "कार्यशिक्षण या विषयातील कोणताही एक विषय" विषयाला पर्याय म्हणून घेता येईल. "ऑटिस्टीक" विद्यार्थ्यांना "गणिताबरोबर" तसेच "२ भाषा विषयांऐवजी" "कार्यशिक्षण विषयांतर्गत ९ विषयांपैकी विषय" निवडण्याची सोय आहे. "कार्यशिक्षण या विषयातील पुढे नमूद केलेल्या ०९ विषयांपैकी कोणताही एक विषय" विषयाला पर्याय म्हणून घेता येईल.

१. **घरगुती विद्युत उपकरणे - (J-1)**
२. **दूध व दूधाचे पदार्थ - (J-5)**
३. **हस्तभरतकाम - (J-9)**
४. **शिवणयंत्राद्वारे शिलाई व शिवणयंत्राची निगा व दुरुस्ती - (K-1)**
५. **टाकाऊ वस्तूंपासून सौंदर्यकृती - (K-5)**
६. पाककला - (L-7)
७. **भारतीय संगीत - (M-3)**
८. **चित्रकला व रंगकाम - (M-6)**
९. **कागदकाम, पुठ्ठाकाम आणि पुस्तक बांधणी - (M-7)**

जून २०१२ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. परंतु हे सर्वच विषय "विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थी" त्यांच्यातील शारीरीक दोषांच्या कमतरतेमुळे विषय परिचित झालेले आहेत. त्यामुळे यावर्षी इ.९वीच्या वर्गात जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत त्यांना या "कार्यशिक्षण" विषयाबाबत शाळेत या विषयांतर्गत जो विषय श्रेणीसाठी शिकविला जात होता, त्याबाबत संपूर्ण माहिती असणार आहे. त्यांची परीक्षा ही त्यात्या शाळेत मंडळ नियमाप्रमाणे घेण्यात यावी. परंतु ज्या "विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी" हा "कार्यानुभव विषय" "भाषेसाठी पर्यायी विषय" म्हणून घेतला असेल, तर त्या विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा आयोजित करावी. (कारण अनेक विशेष शाळेत (special school) या पुस्तकेतील अभ्यासक्रमाप्रमाणे शिकविले जात आहे.)

इ.९वीच्या प्रचलित भाषा विषय योजनेत कोणताही बदल केलेला नाही. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून "कार्यशिक्षण" या विषयाची नवीन मूल्यमापन योजना मंडळाने तयार केलेली आहे. विशेष गरजा असलेले जे विद्यार्थी सामान्य शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यांना फक्त कार्यशिक्षण या विषयाची मूल्यमापन योजना प्रचलित प्रमाणेच राहील, त्यात कोणताही बदल नाही. परंतु, विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांनी भ्राषाऐवजी गणित या विषयाबरोबर कार्यशिक्षणातील कोणताही विषय भाषेला किंवा गणिता बरोबर पर्याय म्हणून घेतलेला असेल तर, त्याच विद्यार्थ्यांसाठी मूल्यमापन योजना लेखी गुण - २५, वार्षिक काम - २५, व प्रात्यक्षिक परीक्षा ५० गुण अशी एकूण १०० गुणांची राहील.

"विज्ञान आणि तंत्रज्ञान" या विषयासाठी शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र हा पर्यायी विषय अभ्यासण्याची, प्रचलित पध्दतीप्रमाणेच सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामध्ये

कोणताही बदल करण्यात आलेला नाही. शरीरशास्त्र भाग-१ ३० गुण, गृहशास्त्र ३० गुण, प्रयोगपरीक्षा २० गुण, २० गुण कृतिपुस्तिका याप्रमाणे एकूण १०० गुणांची राहील.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता ९वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात यावी, तसेच सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून इ.१०वीच्या "कार्यशिक्षण" या विषयाची कार्यवाही करण्यात यावी.

तरी, आपल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्या निदर्शनास सदर बाब आणावी. परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सदर परिपत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव
राज्यमंडळ,पुणे ४.

प्रति,

- विभागीय सचिव,
  पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण विभागीय मंडळ,
  पुणे,नागपूर,औरंगाबाद,मुंबई,कोल्हापूर,अमरावती,नाशिक,लातूर,कोकण.

**यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/ विद्यालय प्रमुखांना त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.**

- प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे १.
२. मा.अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे १.
४. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.
५. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे ३०.
६. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
७. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), सर्व जिल्हा परीषद.
८. शाखा - परीक्षा, पापुअ, पापुई, ऑनलाईन, ग्रंथालय, मा.अध्यक्षांचे अस्विस, मा.सचिवांचे अस्विस.